संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
19 JUN 2026
प्राप्त झाले सही.......................

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्रीम. शोभा अ. भोळे, लेखा अधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.९१/E-१६७१३८१/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १८ जून, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/शो.अ. भोळे/ ३.२६/४५५/३६६/१६६१, दि.२४.०३.२०२६

२) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे आदेश क्र. शुनिप्रा /आस्थापना / १२५९ / २०२५, दि.१.९.२०२५

३) श्रीम. शोभा अ. भोळे, लेखा अधिकारी यांचा अर्ज दि.३.९.२०२५, दि. १६.१२.२०२५ व दि. १७.१२.२०२५

४) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/ श्रीम. शोभा भोळे/प्रतिक्षाधीन/ ०९-२०२५/५१०, दि.९.९.२०२५

५) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे आदेश क्र. का. आ. क्र. अलेका /आस्था - १ / ब / वै. न. / श्रीम. भोळे / २६४, दि.१८.९.२०२५

६) वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२५/प्र. क्र. १५६ / कोषा. प्रशा - २, दि.१२.१२.२०२५

७) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको / रोख /कार्या-१ / श्रीम. भोळे / प्रतिक्षाधीन / १२.२०२५ / ७७२, दि.१६.१२.२०२५

८) सह परिवहन आयुक्त (प्रशासन), परिवहन आयुक्त कार्यालय यांचे पत्र आ.क्र. १३ पआका /का.८(३)/शो.अ.भो./रूजू आदेश/न.क्र.१०३-२०२३/२०२६, जा.क्र.३४४, दि. ९.१.२०२६

९) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. अलेका/ आस्था - १ / ब / वै. न. / भोळे / १५९ / २६० / २०२६, दि.१७.३.२०२६

## -: <u>शासन आदेश</u> :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकरी संवर्गातील श्रीम. शोभा अशोक भोळे यांना संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयातून दि.१.९.२०२५ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. श्रीम. भोळे यांनी संदर्भीय क्र. ३ येथील दि.३.९.२०२५ रोजीच्या अर्जान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालयात दि.३.९.२०२५ (म.पू.) रोजी हजर करुन घेण्यास विनंती केली. तसेच दि.१६.१२.२०२५ रोजीच्या अर्जान्वये दि.१.९.२०२५ रोजीची नैमित्तीक रजा, दि.२.९.२०२५ रोजीच्या गौरी विसर्जन सार्वजनिक सुट्टी ला जोडून मंजूर करण्यास विनंती केली.

३. संचालनालयाचे संदर्भीय क्र. ४ येथील दि.९.९.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. भोळे, यांना प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून संचालनालयात दि.३.९.२०२५ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले व त्यांची सेवा उपयोगात आणण्याकरिता अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात आली.

४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे संदर्भीय क्र. ५ येथील दि.१८.९.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. भोळे यांना दि.१०.९.२०२५ (म.पू.) रोजी सदर कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले.

५. शासन वित्त विभागाचे संदर्भीय क्र. ६ दि.१२.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या श्रीम. भोळे यांना लेखा अधिकारी, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई या पदावर पदस्थाना देण्यात आली. त्यानुसार

01227/2026/1650
22-06-26

संचालनालयाचे संदर्भीय क्र. ७ येथील दि.१६.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये सदर पदावर हजर होण्यासाठी श्रीम. भोळे यांना दि.१६.१२.२०२५ (म.नं.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले. त्यानुसार श्रीम. भोळे, यांच्या दि.१७.१२.२०२५ रोजीच्या अर्जान्वये त्या लेखा अधिकारी, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई या पदावर दि.१७.१२.२०२५ (म.पू) रोजी रुजू झाल्या.

६. परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे संदर्भीय क्र. ८ येथील दिनांक ०९.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. भोळे यांना दि.१७.१२.२०२५ (म.पू.) रोजी रूजू करून घेण्यात आल्याबाबत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

७. श्रीम. भोळे, यांना दि. १.९.२०२५ ते १६.१२.२०२५ पर्यंत म्हणजेच एकूण १०७ दिवस नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.१.९.२०२५ | १ दिवस | दि.१.९.२०२५ (म.पू) रोजी शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.<br>सदर दिवसाची नैमित्तिक रजा दिली आहे. |
| दि.२.९.२०२५ | १ दिवस | गौरी विसर्जन सार्वजनिक सुट्टी |
| दि. ३.९.२०२५ दि. ते ९.९.२०२५ | ७ दिवस | पदसथापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| दि. १०.९.२०२५ ते १५.१२.२०२५ | ९७ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| दि.१६.१२.२०२५ | १ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| एकूण | १०७ दिवस | |

८. श्रीम. भोळे यांना सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून कार्यमुक्त केल्यानंतर त्या तात्काळ संचालनालयात उपस्थित झाल्या होत्या व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीम. भोळे यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

९. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. शोभा अशोक भोळे यांचा दिनांक १.९.२०२५ ते दिनांक १६.१२.२०२५ पर्यंत एकूण १०७ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

तसेच, सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) आंहरण व संवितरण अधिकारी तथा लेखा अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई ,*
६) श्रीम. शोभा अ. भोळे, लेखाधिकारी *
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)